**परिपत्रक क्र. १६ / ज्युनिअर आस्थापना**

अनुदानित / विनाअनुदानित विभागाकडील
कार्यभार व सामान्य सूचना . . .

# रयत शिक्षण संस्था, सातारा

कर्मवीर समाधी परिसर, सातारा

**उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये, व्यवसाय अभ्यासक्रम विभाग व तांत्रिक विभाग**

**परिपत्रक क्र. १६, दि.०५/०६/२०१८**

प्रति,
सर्व शाखाप्रमुख,
उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये, व्यवसाय अभ्यासक्रम विभाग, व तांत्रिक विभाग.

१. **एच.एस.सी परीक्षा निकाल मार्च २०१८ –**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक/उच्च माध्यमिक परीक्षा महामंडळामार्फत मार्च २०१८ मध्ये झालेल्या शालान्त प्रमाणपत्र परीक्षा / उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (+२) विभागाकडील इ.१२ वी चे निकाल जाहीर झालेले असून, सदर निकालाची माहिती आपल्या विभागीय कार्यालयाने दिलेल्या नमुन्यात तयार करून तात्काळ पाठवावी. तसेच आपल्या शाखेचा इ.१२ वी चा निकाल हा बोर्डाच्या निकालापेक्षा कमी असल्यास तो कमी का लागला,याची कारणे व संबंधित शिक्षकाचा खुलासा आपल्या स्पष्ट अभिप्रायासह विभागीय व संस्था कार्यालयास पाठवावा.

२. **हंगामी नियुक्त्या बाबत :-**

संस्थेच्या उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये/ व्यवसाय अभ्यासक्रम व तांत्रिक विभागाकडील अनुदानित /विनाअनुदानित विभागाकडील शै. वर्ष २०१८-१९ मध्ये रिक्त असणा-या पदांवर हंगामी सेवकांच्या नियुक्त्या करण्यासाठी कार्यभार विचारात घेऊन विषयानुसार मागणी करावी. तसेच गतवर्षी द्वितीय सत्रातील ज्या हंगामी सेवकाचे शैक्षणिक कामकाज समाधानकारक नाही. अशा सेवकांना वेळीच सूचना देऊन, त्याच्या पुढील नियुक्तीबाबत योग्य त्या अभिप्रायासह संस्था कार्यालयाकडे कळवावे.

**तसेच संस्थेच्या उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये/ व्यवसाय अभ्यासक्रम व तांत्रिक विभागाकडील अनुदानित /विनाअनुदानित विभागाकडे शै. वर्ष २०१८-१९ मध्ये रिक्त असणा-या पदांवर संस्थेचा नेमणूक आदेश असल्या शिवाय अथवा संस्थेची परवानगी घेतल्या शिवाय कोणत्याही रिक्त जागेवर हंगामी स्वरूपातील उमेदवारास हजर करून घेवू नये. तसे झाल्यास संबंधीत उमेदवाराच्या नियुक्तीची / मानधनाची सर्वस्वी जबाबदारी वैय्यक्तिक शाखा प्रमुखांची राहील.**

पान क्र. २ वर...

३. **उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाकडील भाषा विषयाच्या नियुक्तीबाबत :-**

अनुदानित उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयाकडील व्यवसाय अभ्यासक्रमाकडे भाषा (इंग्रजी,मराठी व पायाभूत अभ्यासक्रम) इत्यादी विषयाच्या अभ्यासक्रमासाठी तासिका तत्वावर नियुक्त्या केल्या जातात. अशा नियुक्त्या करीत असताना शासन नियमाप्रमाणे दरवर्षी नवीन उमेदवारांच्या किंवा उमेदवार अदला-बदलीने नियुक्त्या कराव्या लागतात. तरच व्यवसाय शिक्षण विभागाकडून मान्यता दिली जाते. पर्यायाने अशा सेवकांची संख्या दरवर्षी वाढत जाऊन त्यांना पुनर्नियुक्ती देणे अडचणीचे होत आहे. त्यामुळे संस्थेने व्यवसाय शिक्षण विभागाच्या आदेशानुसार चालू शैक्षणिक वर्षापासून अशा शाखेतील माध्यमिक, उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्यालयातील स्थायी स्वरूपात कार्यरत असणा-या पात्र शिक्षकांना तासिका तत्वावर नियुक्त्या करण्याचे ठरविले आहे. तसेच संबंधित शाखेत असे शिक्षक उपलब्ध झाले नाही तर अशा ठिकाणी Walk in Interview मधील उमेदवारांना नियुक्त्या दिल्या जातील. त्याप्रमाणे तासिका तत्वावरील नियुक्तीसाठी आपल्या शाखेतील, मराठी व इंग्रजी पात्र सेवकांची नावे कळवावीत. अशा सेवकांनी काम करण्यास नकार दिल्यास तसे लेखी घेऊन आपल्या शिफारशीसह या कार्यालयाकडे वेळीच कळवावे.

सचिव,

रयत शिक्षण संस्था, सातारा.

प्रत माहितीसाठी,

१. सहसचिव (उच्च शिक्षण), रयत शिक्षण संस्था,सातारा.
२. सहसचिव (माध्यमिक), रयत शिक्षण संस्था,सातारा.
३. ऑडीटर, रयत शिक्षण संस्था,सातारा.
४. विभागीय अधिकारी, मध्य, दक्षिण, उत्तर, पश्चिम व रायगड विभाग.